# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

माहितीचा अधिकार

# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/E/०००० ३५

**अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (समन्वय)**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्ट नुसार दि. १८.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.१०.२०२३ | २०.१०.२०२३ | २२.११.२०२३ | ०४.०३.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १७.०१.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २०.१०.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १९.१०.२०२३ रोजीच्या ऑनलाईन माहिती अर्जानुसार दि. २२.०९.२०२३ रोजीच्या तक्रारीवर पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे माहिती अर्ज करुन माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी, मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय यांनी माहितीचा अर्ज दि. २०.१०.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालयाकडे हस्तांतरीत केला. अपिलार्थी यांनी दि. २२.११.२०२३ रोजी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाकडे प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०१.०७.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत दि.१९.१०.२०२३ रोजी केलेला ऑनलाईन अर्ज जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे क्र. १२३७ / सपोआ/ समन्वय / माहिती/ २०२३, दि. २०.१०.२०२३ अन्वये पाठविण्यात आलेले पत्र या कार्यालयास दि. ३१.१०.२०२३ रोजी व जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांना ई ऑफीस प्रणालीव्दारे दि. ३१.१०.२०२३ रोजी प्राप्त झालेले

..२/-

आहे. अर्जदार श्री. पंचप्पा काळे, सोलापूर शहर (अपिलार्थी) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत केलेल्या दि.१९.१०.२०२३ रोजीच्या ऑनलाईन अर्जात मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरूपाची तसेच कारणे / स्पष्टीकरण मागणारी असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नियम २(च) माहितीची व्याख्या यामध्ये बसत नाही. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००८/प्र. क्र.९३/०८/सहा (मा.अ.), दि. ०६.०९.२००८ मधील परिच्छेद (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणांकडे कलम २(च) मध्ये व्याख्या केलेली व उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अभिप्रेत असून, जेथे वेगळ्याने माहितीचे संकलन, संशोधन, पृथःकरण करणे आवश्यक आहे. अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. तसेच अर्जदार श्री. पंचप्पा काळे यांचा दि. २२.०९.२०२३ रोजीचा ई-मेल व्दारे प्राप्त विनंती अर्ज या कार्यालयास अग्रेषीत केलेला नाही. तरीही सदर अर्ज संबंधीत १. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, २. पोलीस आयुक्त, पुणे शहर, ३. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांना दि. २१.११.२०२३ रोजी पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी ई-मेल व्दारे पाठविला आहे. याबाबत कार्यालयाचे क्र. पोमसं/२५/६९/माअ (श्री. काळे)/६२४/२०२३, दि. २४.११.२०२३ चे पत्रान्वये अर्जदार श्री. पंचप्पा काळे यांना कळविण्यात आले आहे. सदर माहितीने समाधान न झाल्याने अर्जदार श्री. पंचप्पा काळे, सोलापूर शहर यांनी दि.०४.०३.२०२४ अन्वये ई-मेल व्दारे केलेला प्रथम अपिल अर्ज सहायक पोलीस आयुक्त (समन्वय), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे क्र. ३४०/सपोआ/समन्वय/माहिती/२०२४, दि. ०५.०३.२०२४ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेला प्रथम अपील अर्ज या कार्यालयास दि. १२.०३.२०२४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अपिल अर्जास अनुसरून अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे यांना या कार्यालयाचे क्र. पोमसं/२५/६९/माअ (श्री.काळे)/६२४/२०२४, दि. १५.०३.२०२४ चे ज्ञापान्वये दि. २१.०३.२०२४ रोजी दुपारी १२.०० तसेच पुनः क्र.पोमसं/२५/६९/माअ (श्री. काळे)/६२४/२०२४, दि. २२.०३.२०२४ चे ज्ञापान्वये दि. ०२.०४.२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे) यांचे दालनात सुनावणीकरिता उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे हे दि. २१.०३.२०२४ रोजी व दि. ०२.०४.२०२४ रोजी दोन्ही वेळेस सुनावणी करिता उपस्थित राहीले नाहीत अथवा अनुपस्थितीबाबत या कार्यालयास काहीही कळविले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या महितीशी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे) सहमत असल्याने अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे यांचा ई-मेल व्दारे प्राप्त दि.०४.०३.२०२४ रोजीचा प्रथम अपिल अर्ज निकाली काढल्याबाबत या कार्यालयाचे समक्रमांकीत दि.०७.०५.२०२४ चे पत्रान्वये अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे यांना कळविण्यात आले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२५**

State Information Commission Greater Mumbai